# अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
## कृषि हवामानशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४

ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४/०८/२०२६
### जिल्हा : पुणे

| मागील आठवड्यातील हवामान (२९/०७/२०२६ ते ०४/०८/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०४/०८/२०२६ ते ०८/०८/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **29** | **30** | **31** | **1** | **2** | **3** | **4** | दिनांक | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 4.0 | 0.0 | 14.7 | 30.3 | 1.5 | 1.9 | 8.6 | पाऊस (मिमी) | 15.0 | 19.0 | 14.0 | 8.0 | 6.0 |
| 28.3 | 28.2 | 27.5 | 24.8 | 28.8 | 28.1 | 27.8 | कमाल तापमान (अं.सें.) | 30 | 31 | 31 | 30 | 30 |
| 23.0 | 23.6 | 22.8 | 22.6 | 23.3 | 23.0 | 22.8 | किमान तापमान (अं.सें.) | 25 | 25 | 24 | 24 | 24 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 7 | 8 | 8 | 8 | 7 |
| 92 | 89 | 95 | 86 | 89 | 92 | 90 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 89 | 88 | 87 | 87 | 87 |
| 74 | 83 | 97 | 82 | 89 | 90 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 68 | 68 | 69 | 68 | 67 |
| 7.7 | 10.0 | 9.0 | 6.5 | 7.9 | 6.4 | 6.2 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 16 | 19 | 20 | 20 | 20 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 262 | 263 | 259 | 266 | 268 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्याच्या पूर्व भागात दिनांक ०४ व ०८ ऑगस्ट, २०२६ रोजी काही ठिकाणी तर दिनांक ०५, ०६ व ०७ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून जिल्ह्याच्या पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक ०४ ते ०८ ऑगस्ट, २०२६ दरम्यान बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार<br>➢ जिल्ह्याच्या पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.<br>➢ जिल्ह्याच्या पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक ०५ व ०६ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता आहे. |
| **विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)** | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०२ ते ०८ ऑगस्ट, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | • पावसाची शक्यता असल्याने सर्व उभ्या पिकांमधील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा.<br>• हुमणी कीड : हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ , बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम अँनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम).<br>• सर्व उभ्या पिकांना ढगाळ हवामानामुळे किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास फुले बायोमिक्स ची फवारणी पेरणीनंतर ३० दिवसांनी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास पेरणीनंतर ३५ दिवसांनी फुले ग्रेड II ची पहिली फवारणी ५ मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **खरीप भात** | रोपवाटिका | भात खाचरातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत १ ते २ सें.मी. आणि रोपांच्या वाढीच्या प्राथमिक अवस्थेत २ ते ३ सें.मी असावी. |
| **ऊस** | पीक वाढीची अवस्था | पिकातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| **सोयाबीन** | पीक वाढीची अवस्था | सोयाबीन पिकातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. पीक पिवळे पडले असल्यास पाण्याचा निचरा केल्यानंतर पिकावर २ % युरिया किंवा १% १९:१९:१९ पाण्यातून फवारणी पावसाची उघडीप बघून करावी. ढगाळ हवामानामुळे रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फ्लोनिकामिड ५०% डब्लू. जी. ४ ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणे पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. उगवणपश्चात २० दिवसानंतर |

| | | |
|---|---|---|
| | | इमॅझीथायपर १०% एस.एल. २ मिली. प्रति लीटर पाणी तणनाशकाची फवारणी करावी. |
| **मुग/उडीद** | पीक वाढीची अवस्था | शेतातील रोगग्रस्त झाडे उपटून टाका आणि ती नष्ट करा वीत. गरजेप्रमाणे आंतरमशागत निंदणी/कोळपणी करून पिक तण विरहित ठेवावे. रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, ५ % निंबोळी अर्काची फवारणी पावसाची उघडीप बघून करावी आणि प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे वापरावेत. |
| **मका** | पीक वाढीची अवस्था | पेरणीनंतर ३० दिवसांनी पिकास नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. पिकातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. गरजेप्रमाणे आंतरमशागत निंदणी/कोळपणी करून पिक तण विरहित ठेवावे. किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ८-१० कामगंध सापळे प्रति एकर लावावेत. |
| **मिरची** | पीक वाढीची अवस्था | मिरची रोपे पुनर्रलागवडीनंतर मर रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बनडांझीम ५०% डब्ल्यू पी ३ ग्रॅम अथवा ट्रायकोडर्मा व्हीरीडी ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे अळवणी करावी. |
| **टोमॅटो** | पीक वाढीची अवस्था | टोमॅटो रोपांच्या पुनर्रलागवडीनंतर मर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सिक्लोटराईड३ ग्रॅम आणि ह्युमिक ऍसिड २ मिलि प्रति लिटर पाणी प्रमाणे अळवणी करावी. |
| **भेंडी** | पीक वाढीची अवस्था | भेंडी पिकावरील रसशोषक किडी (मावा, तुडतुडे आणि फुलकिडे) यांच्या प्रभावी नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रीड ७०% डब्ल्यु. जी. १ ग्रॅम किंवा थायोमेथोक्झाम २५ डब्ल्यु. जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | नवीन लागवड केलेल्या केळी बागेतून अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करावा. लागवडीच्या वेळी अॅझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, शेणखतात मिसळून द्यावीत तसेच गंधक २० ग्रॅम शेणखतात आठवडाभर मुरवून (१:१० प्रमाणात) प्रति झाड दोन समान हस्यात लागवडीच्यावेळी व लागवडीनंतर १६५ दिवसांनी द्यावे. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| **बटाटा** | पीक वाढीची अवस्था | १. बटाटा लागवडीनंतर ४ ते ५ दिवसांनी जमीन वापश्यावर असताना उगवणाऱ्या तणांच्या बंदोबस्तासाठी मेट्रिब्युझीन ७० टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी या तणनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात जमिनीवर फवारणी करावी.<br>२. बटाटा पिकाची लागवड होऊन उगवण झाली असल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून कॉपर ऑक्सीक्लोराईड या बुरशीनाशकाची २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे शेतात वा पसा असताना आळवणी करावी.<br>३. बटाटा लागवड झाल्यानंतर बऱ्याच दिवस पावसाने उघडीस दिल्यावर कोळी किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो त्यामुळे प्रादुर्भाव दिसताच डायफेंथिउरॉन ४७.८० एस सी हे कीटकनाशक १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारावे . किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. |
| **अंजीर** | पीक वाढीची अवस्था | खट्टा बहार : अंजीराला कोवळी पाने फुटल्यानंतर साधारणत: छाटणीनंतर २० दिवसापासून १५ दिवसाच्या अंतराने २० ग्रॅम क्लोरोथॅलोनील अधिक १० ग्रॅम कार्बेनडॅझीम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे किंवा १० ग्रॅम कार्बेनडॅझीम अधिक २५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा १० ग्रॅम कार्बेनडॅझीम अधिक २० ग्रॅम कॅप्टन वरील पैकी कोणतीही एक फवारणी आलटून पालटून करावी. अंजीर काढणीच्या एक महिना अगोदर फवारणी बंद करावी . अंजीराला लेबल क्लेम नाहीत. |
| **सिताफळ** | पीक वाढीची अवस्था | सिताफळातील पिठ्या ढेकूण या किडीच्या नियंत्रणासाठी लेकेनोसिलियम लेकॅनी (व्हर्टीसिलियम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिशऑईल रोझीन सोप ५ ग्रॅम किंवा मेटारायझीयम ५ ग्रॅम आणि ५ मिली दुध प्रति लिटर पाणी याप्रमाणात आर्द्रतायुक्त हवामान असताना फवारणी करावी. |
| **डाळिंब** | पीक वाढीची अवस्था | सततचा पाऊस, हवेतील जास्त आर्द्रता आणि ढगाळ वातावरणामुळे फुलकिडे ( Thrips) आणि फळ पोखरणारी अळी (Fruit Borer) किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने सायँट्रानिलीप्रोल १०.२६% OD (१मिली/लि) किंवा लॅम्ब्डा-सायहेलोथ्रिन ०४.९०% CS (१मिली/लि ) किंवा ब्रोफ्लानिलाईड २०% SC (२.५मिली/१०लि )चा शिफारसीनुसार फवारणीसाठी वापर करावा. पिठ्या ढेकूण (Mealybug) व खवले कीडीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५% EC (३ मिली/लि) ची फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | ऑगस्ट महिन्यात जनावरांना लाळ्या खुरकूत ( FMD), घटसर्प (HS) आणि फऱ्या (BQ) या रोगांवर लसीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. महाराष्ट्रात १३ ऑगस्ट २०२६ पासून लाळ्या खुरकूत प्रतिबंधक लसीकरणाची नववी फेरी सुरू होत आहे. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे.<br>स्वच्छ दुध उत्पादनासाठी महत्वाचे उपाय : जनावरांचा गोठा आणि दुध काढण्याची जागा शक्यतो वेगळी ठेवावी. जनावरांची कास, शेपटी व शरीर दुध काढण्यापुर्वी नीट स्वच्छ करावी. दुध काढताना हात व भांडी निर्जंतुक असावीत. संपुर्ण मुठ पद्धतीने ७-८ मिनिटात दुध काढावे. दूध गाळून थंड पाण्यात किंवा बर्फात साठवावे व लवकर विक्रि करावी. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत उत्पादित होणाऱ्या जिवाणू खतांची माहिती तसेच उपलब्धता ठिकाण कृषि अणुजीवशास्त्रज्ञ, कृषि महाविद्यालय, पुणे-४११००५ फोन नं.: (०२०) २५५३७०३३ विस्तार २३२ किंवा २२८**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : ०४.०८.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**